महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १५

# महाराजा सयाजीराव आणि कर्मवीर भाऊराव पाटील

शिवानी घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १५

# महाराजा सयाजीराव
# आणि
# कर्मवीर भाऊराव पाटील

शिवानी घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
कर्मवीर भाऊराव पाटील
इतिहास
शिवानी घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - ३५
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : शिवानी घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ४१६११४
मो. ८०१०४४७७४०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३५ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# कर्मवीर भाऊराव पाटील

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीच्या इतिहासात फुले-शाहू-आंबेडकरांनंतर महत्त्वाचे नाव म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. कर्मवीरांनी फुलेंच्या स्वप्नातील शिक्षण प्रसाराचे काम अतिशय जिद्दीने पुढे नेले. ज्या गावात एसटी बस जात नव्हती त्या गावापर्यंत कर्मवीरांनी शिक्षण पोहोचविले. त्यामुळेच आज महाराष्ट्र शैक्षणिकदृष्ट्या प्रगत होण्यामध्ये कर्मवीर भाऊरावांचा वाटा महत्त्वाचा आहे. कर्मवीर हे स्वत:ला फुलेंचा अनुयायी मानत होते. त्यांनी आयुष्यभर शिक्षणाच्या कामाबरोबर सत्यशोधक चळवळ आणि दलित चळवळीला पूर्ण सहकार्य केले.

महाराष्ट्रात ज्या अनेक शिक्षण संस्था खेडोपाडी स्थापन झाल्या त्यांनी कर्मवीरांकडून प्रेरणा घेतली होती. सयाजीरावांनी बडोद्यातून महाराष्ट्राच्या शैक्षणिक उन्नतीला पायाभूत आणि सर्वाधिक मदत केली आणि त्यातून बहुजनांच्या शैक्षणिक उन्नतीचा पाया घातला. महाराजांच्या या कामाचा प्रभाव महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासावर स्पष्टपणे दिसतो. गंगारामभाऊ म्हस्के यांची डेक्कन

मराठा एज्युकेशन असोसिएशन, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, बडोद्यातील मराठा शिक्षण फंड अशा विविध मार्गांनी सयाजीरावांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासाला बळ दिले. महाराजांचे हे योगदान महाराष्ट्रासाठी नवे आहे कारण आपल्या पुरोगामी परंपरेने या मूलभूत इतिहासाकडे कमालीचे दुर्लक्ष केले.

कर्मवीर भाऊराव पाटील आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नातेसुध्दा महाराष्ट्रासाठी पूर्णत: अज्ञात आहे. कर्मवीर त्यांच्या उमेदीच्या काळात कोल्हापुरात शाहू महाराजांच्या सहवासात वाढले होते. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शैक्षणिक कामाची प्रेरणा शाहू महाराज आहेत असे सांगण्याची प्रथा महाराष्ट्रात रूढ आहे. परंतु हे अर्धसत्य आहे. कारण कर्मवीरांनी स्थापन केलेल्या पहिल्या बोर्डिंगला त्यांनी राजर्षी शाहूंचे नाव दिले होते. परंतु अस्पृश्यांसह बहुजनांच्या शिक्षणाचे कार्य करण्याची प्रेरणा त्यांना सयाजीरावांचे भाषण ऐकून मिळाली होती. कर्मवीरांनी स्वत: जाहीर भाषणात या बाबीचा उल्लेख केला होता. परंतु आपण मात्र कर्मवीरांचे हे भाषण पुरेशा गांभीर्याने घेतले नाही.

कर्मवीर भाऊराव पाटील हे १९०२ ते १९०९ या कालावधीत शिक्षणानिमित्त कोल्हापुरात वास्तव्यास होते. यादरम्यान त्यांच्यावर बहुजनांच्या शिक्षणाचा पहिला संस्कार झाला. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या जैन बोर्डिंगचे ते विद्यार्थी होते. कोल्हापुरातील हा काळ वेदोक्ताच्या निमित्ताने ब्राह्मण-ब्राह्मणेतर

वादाचा होता. महत्त्वाचे म्हणजे परंपरावादी शाहूंचे पुरोगामी शाहूंमध्ये क्रांतिकारक परिवर्तन याच कालखंडात सुरू झाले होते. १९०९ ला शिक्षण अर्धवट सोडून ते कोल्हापुरातून बाहेर पडले. कोल्हापुरातील वास्तव्यात भाऊराव काही काळ शाहू महाराजांच्या राजवाड्यावर राहिले होते. या सर्व कालखंडात शाहू महाराजांमधील दिलदार माणूस त्यांनी अनुभवला होता.

## सयाजीरावांची प्रेरणा

१९०२ पासून भास्करराव जाधव व गणपतराव वकील यांच्या 'दीनबंधू' वर्तमानपत्राच्या माध्यमातून महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव कर्मवीर भाऊराव पाटलांवर पडत होता. १९०६ मध्ये अस्पृश्यता उद्धारासंदर्भातील सयाजीराव महाराजांच्या वाचलेल्या भाषणाचा प्रभाव कर्मवीरांची प्रेरणा होती. १९०८ मध्ये कोल्हापुरातील मिस क्लार्क वसतिगृहाचे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या प्रसंगी केलेल्या भाषणात त्यांनी मांडलेल्या डिप्रेस्ड क्लास मिशनविषयक विचारांनीसुद्धा कर्मवीर भाऊराव पाटलांच्या भावी कार्याला विधायक दिशा दिली.

## शाहू छत्रपती बोर्डिंग हाऊसला भेट

भाऊराव पाटलांनी साताऱ्यात स्थापन केलेल्या छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसला सयाजीरावांनी ४ एप्रिल १९३३ रोजी भेट दिली. यावेळी भाऊराव पाटील यांनी श्रीमंतांचे स्वागत केले. नंतर आम्रवृक्षांच्या छायेखाली खुल्या पटांगणात तयार केलेल्या

सभास्थानी सयाजीराव दाखल होताच सर्व जातींच्या जमलेल्या प्रचंड जनसमूहाने उभे राहून श्रीमंतांचे स्वागत केले. अकरा साडे अकराच्या तीव्र उन्हात ही सभा सुरू होती पण आमराईची ती गर्द सावली तीन हजार जनसमूहाचे उन्हापासून संरक्षण करत होती. सर्व स्त्रीपुरुष सयाजीरावांचे दर्शन करून स्वत:ला भाग्यशाली मनात होते. सर्वांचे डोळे श्रीमंतांच्या त्या तेजस्वी मूर्तीकडे वेधून गेल्याचे स्पष्ट दिसत होते.

## कर्मवीरांचे स्वागतपर भाषण

यावेळी भाऊराव पाटलांनी महाराजांचे स्वागत करताना जे भाषण केले ते फारच ऐतिहासिक आहे. या भाषणात भाऊराव पाटील म्हणतात, “श्रीमंत महाराजसाहेब, श्रीमंत युवराज प्रतापसिंह, श्रीमंत राजपौत्र उदयसिंह व बंधुभगिनीहो, माझ्यासारख्या फकिराच्या आमंत्रणांस मान देऊन श्रीमंत महाराजसाहेब, आपणास हजार प्रकारची महत्त्वाची, निकडीची कामे असताना व आपले प्रकृतिमान बरे नसतानादेखील आपण तकलीफ सोसून, वेळांत वेळ काढून सर्व परिवारासह या संन्याशाच्या झोपडीत आलात त्याबद्दल मी श्रीमंतांचे आभार कोणत्या शब्दांनी मानू तेच मला समजत नाही. माझ्याजवळ आपल्यासारखा थोर राजर्षीचे योग्य स्वागत करण्यास अंत:करणाच्या जिव्हाळ्याशिवाय दुसरे काही नाही. महाराज, आपण केलेल्या या अनुग्रहाबद्दल मी आपला उतराई कसा होऊ तेच मला समजत नाही. पण आपणास मी आमंत्रण केले

त्यावेळी माझ्या मनाचा मी असा संकल्प केला होता की, या राजर्षीचे पाय वाटेल ते करून माझ्या झोपडीस लागतील असे मी करीन आणि तो माझा संकल्प सिद्धीस गेल्याचे पाहून मला किती आनंद होत असेल याची कल्पना आपण सर्वांनी करावी.”

“महाराज, आपण थोर विभूति असून, आपल्या विलक्षण राज्यपद्धतीमुळे व राजकारणपटुत्वामुळे फक्त हिंदुस्थानच नव्हे तर अखिल दुनियेचे डोळे आपल्याकडे वेधून घेतले आहेत. त्याशिवाय आपण कट्टे सुधारक व उच्चतम कोटीतील देशभक्त आहात. १९०६ साली मी आपले अस्पृश्योद्धारासंबंधीचे भाषण वाचले व त्या भाषणाने माझ्या मनामध्ये अतिशय खळबळ उडवून दिली. मी तेव्हाच निश्चय केला की, श्रीमंत महाराजांनी दर्शविलेल्या विचाराप्रमाणे व व्यक्त केलेल्या ध्येयास अनुसरून आजन्म प्रयत्न करावयाचा, उपजीविकेस साधन म्हणून नोकरी करून जे काही पैसे शिल्लक राहतील ते हीन मानलेल्या लोकांस ज्ञान देऊन त्यांना पुढे आणण्यामध्ये खर्च करावयाचे. या हेतूने मी काही दिवस नोकरीही केली, परंतु त्या व्यवसायामुळे माझे ध्येय बरोबर मला गाठता येईना, म्हणून नोकरीवर मी तिलांजली दिली व प्रस्तुतचे कार्य अंगावर घेतले.”

“माझ्या कार्यास दिवंगत श्री. शाहू छत्रपती महाराज यांचा पूर्ण पाठिंबा होता. त्यांना मी माझे विचार दर्शविले, तेव्हा त्यांनी आपली सहानुभूती व्यक्त केली. मी भिक्षा मागण्याच्या पद्धतीच्या विरुद्ध प्रथमपासूनच आहे. म्हणून मी त्यांच्याजवळ

आर्थिक मदत मागितली नाही. परंतु मी त्यांना सांगितले की, महाराज मला आपल्या पदरी असलेले निवडक पहिलवान द्या. मी त्यांच्या कुस्त्या सर्व हिंदुस्थानभर करून त्यांतून खर्च वजा जाता जे निव्वळ उत्पन्न राहील ते या संस्थेकडे वापरीन. तेव्हा ते म्हणाले की, माझ्या पैलवानाचे पोषण अशा तऱ्हेने करण्याची मागणी करणारा तू एकटाच मला भेटलास."

"या संस्थेमध्ये हल्ली शंभर मुले आहेत. त्यापैकी पन्नास अस्पृश्य व बाकी स्पृश्य आहेत. दरेक मुलांस मासिक खर्च पाच रुपये येतो, त्यापैकी स्वतःच्या कष्टाने दरेक जण दीड रुपया कमावितो व निव्वळ बाकी खर्च फक्त साडेतीन रुपये येतो. दरेक विद्यार्थी आळीपाळीने भांडी घासणे, स्वयंपाक करणे, शेण काढणे, झाडलोट करणे, बागेमध्ये काम करणे इत्यादी कामे करतो. ही कामे करवून घेण्याचा हेतू हा आहे की, अशा प्रकारची कामे हे हीनपणाचे न समजता सन्माननीय समजले पाहिजे व तो ठसा मनावर उमटून दरेकास dignity of labour (काबाडकष्टाची प्रभुता) बरोबर समजावी हा होय. आठ महिने सर्व मुले आम्रवृक्षाच्या छायेखालीच निजणे-बसणे करतात. म्हणजे उघड्या हवेमध्येच राहतात व पावसाळ्याचे फक्त चार महिनेच येथे असलेल्या झोपड्यांचा आश्रय घेतात. या शाळेतील महार वगैरे पुष्कळ विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या शिक्षणसंस्थांमध्ये संस्कृत सारख्या गहन विषयांमध्येदेखील पारितोषिके पटकाविली

आहेत, हे सांगण्यास मला अभिमान वाटतो. यावरून काय सिद्ध होते तर हे की, या हीन मानलेल्या लोकांना जर संधी मिळाली तर ते इतर पांढरपेशा लोकांपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी नाहीत हे होय.”

“येथे आम्ही विद्यार्थ्यास स्वाभिमानी होण्यास शिकवितो. आम्ही याचना करीत नाही व त्यांना याचना करण्यास शिकवीत नाही. दान देण्यास हात वर ठेवा, पण ते घेण्यास हात पसरू नका असे आम्ही त्यांना सांगतो आणि म्हणूनच कष्ट सोसण्यास ते उद्युक्त होतात. या संस्थेतून ते स्वाभिमानी, कार्यक्षम व उदारमतवादी नागरिक बनून बाहेर पडतील असे ध्येय आम्ही ठेवले आहे.”

“श्रीमंत सरकार महाराजसाहेब गेल्या डिसेंबर १९३२ च्या पाचव्या तारखेस व्हिक्टोरिया बोटीने मुंबई बंदरी बॅलाई पियरवर जेव्हा उतरले तेव्हा मी श्रीमंतांना तेथे भेटलो. ही माझी भेट ९ वर्षांनी झाली तरी श्रीमंतांनी मला ताबडतोब ओळखून ‘काय भाऊराव, दाढी का व केव्हापासून वाढविली’ असे विचारले. त्यावेळी त्या प्रश्नाचा जबाब मी दिला नाही. मी माझी जेव्हा एका कारखान्यांतील नोकरी काही कारणांनी सोडली तेव्हा मी अशी प्रतिज्ञा केली की, त्या कारखान्यांतील सर्व जागा या संस्थेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी जोपर्यंत पटकावल्या नाहीत तोपर्यंत मी केसास हात लावणार नाही. महाराज, दाढी वाढविण्याचे हे कारण मी आपणापुढे जाहीर करतो.”

"महाराज, आपण गुणांचे चाहते आहात म्हणून आपल्या सभोवार गुणी माणसे आपणाकडे आकर्षून येतात. आमच्या जिल्ह्यांतील एक अमूल्य हिरा मे. रामचंद्रराव माने पाटील हे आपल्याकडे आहेत. आपल्या अंगी काय जादू असेल ती असो मे. माने पाटील हे अत्यंत राजनिष्ठ असून त्यांची आपणावर अप्रतिम भक्ती आहे असे माझ्या अनुभवास आले आहे. मुंबई इलाख्यातील दिवाणपद त्यांना प्राप्त व्हावे अशी सर्व सातारा जिल्हानिवासीयांची इच्छा असल्यामुळे या जिल्ह्यातर्फे त्यांनी काउन्सिल निवडणुकीकरिता उभे राहण्यास यावे अशाबद्दल निमंत्रण करण्यास मी बडोद्यास गेलो होतो, तेव्हा त्यांनी मला स्पष्ट सांगितले की, "भाऊराव, मी सयाजीराव महाराजांचे पाय सोडणार नाही." मी त्यांना पुनः पुनः विनंती केली तरी त्यांच्याकडून तेच उत्तर मिळाले, अशा प्रकारचा कार्यक्षम नेता आपण आपल्या येथे गुंतवून ठेवला यामुळे आपल्या जिल्ह्याचे अपरीमित नुकसान झाले आहे हे सांगण्यामध्ये मी काही तक्रार करीत नाही. परंतु गुणी माणसांची निवड करून त्यात स्वामिनिष्ठ करून ठेवण्याची आपली हातोटी उत्कृष्ट आहे, हे सांगण्याचा माझा हेतू आहे.

शेवटी माझ्या कार्यास येथील प्रसिद्ध पुढारी रा. वा. काळे व रा. रा. दादासाहेब करंदीकर यांची सहानुभूती असून ते मला पूर्ण मदद करतात, त्याचा उल्लेख महाराज जाहीर रीतीने आपणासमक्ष करून, पुन्हा एक वेळ आपण आपला अमूल्य वेळ खर्च करून

माझे सुदाम्याचे पोहे गोड करून घेतले व मला भेटीचा मान दिला त्याबद्दल आपले उपकार मानून, आपल्या अमृततुल्य वाणीतून उपदेशामृत श्रवणाची आम्हा सर्वांची पिपासा तृप्त करण्याबद्दल आपल्या चरणी विनंती करून महाराज, मी आपली रजा घेतो.”

## महाराजा सयाजीरावांचे भाषण

यावेळी सयाजीराव महाराजांनी केलेले भाषणसुध्दा अत्यंत मौलिक होते. या भाषणात सयाजीराव म्हणतात, “भाऊराव पाटील व सद्गृहस्थहो, आजचे हे बोर्डिंग ज्या हेतूने रा. भाऊरावांनी ते चालविले आहे तो हेतू पाहून मला फार आनंद वाटला. आज आपल्या देशात सर्व जातीची मुले एकत्र राहतील अशा बोर्डिंगांची खरोखर फार जरूर आहे. भाऊरावांच्या या वसतिगृहासारखी आणखी पुष्कळ वसतिगृहे निघाली पाहिजेत.

## मागील वाईट गोष्टी विसरा :

२. आपली अवनती आपल्यातील कृत्रिम जातिभेदामुळेच झाली आहे. हिंदू मुसलमान हा भेदसुद्धा कृत्रिमच आहे. हिंदू मुसलमानांत पूर्वी झगडे झाले, लढाया झाल्या, पण त्या प्रसंगावशात झाल्या. पूर्वीचे द्वेष व भेद आपण आता विसरले पाहिजेत. कारण विस्मृती ही परमेश्वराने मनुष्यास एक मोठी देणगी दिलेली असून, आपण जर त्या देणगीचा योग्य उपयोग केला आणि पुष्कळशा गोष्टी विसरून गेलो तर आपले आयुष्य सुखी होऊन देशाचाही उद्धार होईल. आपले चुकते ते हे की, आपण चांगल्या गोष्टी विसरून वाईट गोष्टी मात्र उराशी बाळगून असतो.

## व्यापक दृष्टीची जरूरी :

३. उदाहरणार्थ आपण धर्माची गोष्ट घेऊ. खरा धर्म कोणता हे आपण विसरून गेलो आहो आणि भलत्याच कोत्या समजुती धर्म म्हणून घट्ट धरून बसलो. आज आपल्या असमतेच्या ज्या खुळ्या कल्पना आहेत तो खरा धर्म आहे काय ? खरा धर्म म्हणजे समतेचा व भूतदयेचा आहे. हे सद्गुण ज्यांत नसतील तो खरा धर्म नव्हे. तुम्ही हिंदुस्थानबाहेरच्या जगाकडे पाहा, म्हणजे तुमची दृष्टी विस्तृत होऊन खरा धर्म कोणता व आज आपण समजतो व पाळतो तो खरा धर्म कसा नाही, हे तुम्हास समजून येईल. आमच्यातल्या ज्या लोकांना शक्य असेल त्यांनी परदेशांतून प्रवास करावा. प्रवासाने दृष्टी, बुद्धी व कल्पना व्यापक होतात, शिवाय आपल्या वेडगळ धार्मिक समजुतींमुळे हिंदुस्थानचे जगात कसे हसे झाले आहे व आपल्याला जगात कोणता दर्जा प्राप्त झाला आहे हे दिसेल.

## मनुष्यप्राणी हा सवयीचा गुलाम असतो :

४. मनुष्यप्राणी हा सवयीचा गुलाम असतो. सवयीने ज्या गोष्टी व कल्पना अंगवळणी पडतात त्याच आपण पुढे ईश्वरनिर्मित मानू लागतो आणि तोच पुढे धर्म समजला जातो. पण हे अगदी चूकीचे आहे. उदाहरणार्थ अंत्यजांचीच गोष्ट घ्या. ही गोष्ट केवळ सवयीने अस्तित्वात आली आहे, पण अंत्यज किंवा चातुर्वर्ण्य हे ईश्वरनिर्मित आहे, परंतु निव्वळ सवयीने अंगवळणी पडलेल्या आचारांना व कल्पनांना धर्म समजू नका. इतिहासाचे अध्ययन

करा, तुम्ही इतिहासाकडे पाहिले तर तुम्हास असल्या खोट्या समजुतींमुळे समाजात भेद उत्पन्न होऊन देशाचे व समाजाचे किती नुकसान झाले आहे, हे दिसून येईल.

## खरा धर्म म्हणजे समता :

५. आपल्यातल्या या अनेक जाती, धर्म व त्यामुळे उत्पन्न होणारे तंटे व देशाची तदुत्पन्न हानी या गोष्टी पाहिल्या म्हणजे मला तर असे वाटू लागते की, महंमद पैगंबरांचे अनुकरण करून, त्यांनी ज्या दिशेने एकी करण्याचा प्रयत्न केला त्या दिशेने आपण प्रयत्न करण्याचा काळ खचित आला आहे. सर्वत्र समता प्रस्थापित करून त्या काळी महंमद पैगंबराने खरोखरच फार महत्त्वाचे व मोठे कार्य केले, मनुष्यमात्र सर्व एक असून त्याचा दर्जा त्याच्या गुणांवरच ठरला पाहिजे. ज्याच्यांत सद्गुण असेल तोच विद्वान व ब्राह्मण-मग त्याचा जन्म अंत्यज कुलांत झालेला असला तरी हरकत नाही, त्याला आपण मान दिला पाहिजे. जो शौर्य दाखवील तो क्षत्रिय मग तो जन्माने ब्राह्मणही असेल. सर्व मनुष्यांना सम लेखून, ज्याला त्याला त्याच्या गुणांप्रमाणे पुढे येण्यास संधी देणे हाच खरा धर्म.

## स्वर्ग व नरक येथेच आहेत :

६. आपण स्वर्ग मिळण्यासाठी धर्म पाळतो. पण आज आपण धर्म म्हणून पाळत असलेल्या आचारांनी आपल्यास स्वर्ग खरोखरच मिळत असेल काय? स्वर्ग व नरक खरोखरच

आहेत की नाहीत आणि मरणानंतर स्वर्ग मिळतो की नाही, हे प्रश्न फार गूढ व वादग्रस्त असून त्यांचा निर्णय ज्याने त्याने आपल्या बुद्धीप्रमाणे करावा. मी या बाबतीत जो विचार केला आहे, त्यावरून तरी माझे असे ठाम मत झाले आहे की, स्वर्ग व नरक मरणानंतर नसून येथेच या जगांत आहेत. आपण आपल्या कर्माने येथेच स्वर्ग मिळवितो किंवा येथेच नरकात जातो. मरणानंतर स्वर्ग मिळविण्याची हाव धरण्यापेक्षा येथेच स्वर्ग मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरणे अधिक शहाणपणाचे नाही का?

## सर्व जातीत ज्ञानप्रसार होण्यानेच खरी सुधारणा होईल :

७. आज आपण सर्वजण कृत्रिम अडचणी उत्पन्न करून कष्ट सोशीत आहोत. मागला इतिहास पाहा किंवा आजचाही पहा. वेदोक्त प्रकरण, ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद, हे अगदी निरर्थक होते. ते कृत्रिम अडचणींमुळे उत्पन्न झाले. या सर्व कृत्रिम अडचणी आणि सवयीमुळे बनलेल्या घातक समजुती ज्ञानप्रसारानेच नष्ट होतील, म्हणून समाजातल्या सर्व जातीत सारखा ज्ञानप्रसार केला पाहिजे. मात्र जुलुमाने लोकांची मते बदलण्याचा प्रयत्न निष्फळ होईल. आरंभी त्यांच्या कलानेच घेतले पाहिजे. माझ्या संस्थानात आमचे मराठे सरदार प्रथम इतर जातींबरोबर कसलाही अन्य व्यवहार करण्यास तयार नसत. पण मी त्यांच्यावर कधी सक्ती केली नाही. धर्मसमजुती जुलुमाने बदलणे शक्य नाही, हे जाणून मी सर्व जातींमध्ये ज्ञानप्रसाराचा उपक्रम सुरू केला.

त्यानंतर राजवाड्यांत मेजवानीच्या वेळी टेबलावर पाने मांडण्याची पद्धत सुरू केली. पण प्रत्येक जातीची टेबले व त्यांचे खालची बिछायत वेगळी ठेवण्याची जबाबदारी घेतली. ते लोकांच्या अंगवळणी पडल्यानंतर सर्वांना बिछायत एकच, पण टेबले मात्र वेगळी असे एक पाऊल पुढे टाकले आणि आता आमच्याकडे जेवण्याखाण्यात कोणी कसलाच जातिभेद पाळीत नाही. ज्ञानप्रसार व धीमेपणा या दोन कारणांमुळेच इतकी सुधारणा होऊ शकली.

## निश्चयाने मनुष्य काय करू शकतो ? :

८. असली कृत्रिम बंधने ज्ञानप्रसाराने नष्ट करून समाजात ऐक्यभाव उत्पन्न करण्यासाठीच रा. भाऊरावांच्या या वसतिगृहासारख्या बोर्डिंगाची फार जरूर आहे. भाऊरावांचे हे कार्य फार श्रेष्ठ असून त्यात त्यांनी संपादन केलेले यश पाहून फार आश्चर्य वाटते. अशा नमुन्याचे वसतिगृह माझ्या संस्थांनातही काढण्याचा मी प्रयत्न करणार आहे. हे निश्चयाचे फळ असून निश्चयाने मनुष्य काय करू शकतो याचे हे जिवंत उदाहरण आहे.

## खरा श्रीमंत कोण? :

९. या संस्थेला रा. ब. काळे व दादासाहेब करंदीकर हे चांगल्या प्रकारे साहाय्य करतात असे भाऊरावांनी आपल्या भाषणात सांगितले, ते ऐकून मला संतोष वाटला. परंतु ते असेही म्हणाले की, यात ते आपले कर्तव्यच करतात. या पलीकडे जास्त

काही नाही. कारण सुस्थितीत असलेल्या मनुष्याविषयी प्रेम व सहानुभूती बाळगून त्याजबद्दल आपले कर्तव्य काय हे समजले पाहिजे, असे जो करील तोच खरा श्रीमंत मी तरी स्वतःपुढे हेच ध्येय ठेवले असून त्याप्रमाणे गेली चाळीस वर्षे वागण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे. अगदी शिकण्याच्या जिज्ञासू बुद्धीने माझ्या गरीब रयतेत सारखी मिळून मिसळून वागलो. मी तिच्या अडचणी आणि गरजा समक्ष समजावून घेतल्या. त्यायोगे माझा पुष्कळ फायदा झाला. मी पुष्कळ नवीन गोष्टी शिकलो. रयतेच्या अडचणी दूर करून तिची उन्नती करणे हे माझे मूळ कर्तव्य आहे, याची मला जाणीवही याच माझ्या मोकळेपणाने मिसळल्याने झाली व लोकांच्या अडचणींची प्रत्यक्ष कल्पना मला झाल्यामुळे त्या दूर करण्याचे उपाय योजिले आणि त्यात मला यशही मिळाले हे आपणास माहीत आहेच.

## विद्यार्थ्यांनी स्पार्टन लोकांप्रमाणे शरीरसामर्थ्य वाढविले पाहिजे :

१०. मुलांना या वसतिगृहात साधेपणाचे जे शिक्षण मिळते ते फार चांगले आहे.त्यांनी स्पार्टन लोकांप्रमाणे काटक व मजबूत होऊन शरीरसामर्थ्य वाढविले पाहिजे. मात्र अभ्यास किंवा इतर श्रम करताना त्यांच्या शारीरिक शक्तीवर विशेष आघात होऊन पुढील आयुष्यक्रम आक्रमिण्यास ते निरंतरचे नालायक न होतील या गोष्टींकडेही चालकांनी विशेष लक्ष ठेवले पाहिजे.

## आभार :

११. रा. भाऊराव यांनी चालविलेल्या या उत्कृष्ट संस्थेची दिवसेंदिवस भरभराट होवो व तिच्यासारख्या अनेक संस्था देशभर पसरून त्यातून खरे देशहित साधणारे आर्यभूंचे सुपुत्र बाहेर पडून आपल्या देशाचा उद्धार होवो अशी इच्छा प्रदर्शित करून रा. भाऊराव यांनी ही उत्कृष्ट संस्था पाहण्याची मला जी संधी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानून मी आपले भाषण पुरे करतो.

## विद्यार्थ्यांसोबत जेवण

दुपारच्या जेवणाची वेळ टळून गेली असल्याने भाऊरावांनी महाराजांना विचारले, "मुलांचं जेवण तयार आहे. श्रीमंतांनी सुदाम्याघरचे पोहे..."

महाराज पटकन म्हणाले, "माझ्यासाठी वेगळं काही करू नका. मुलं दुपारी जे जेवणार तेच आणा." भाऊरावांनी ताटात झुणका भाकर वाढून आणली. महाराजांनी हातात भाकरी घेतली. त्यावर झुणका घेऊन ते उभ्या उभ्या आनंद घेऊ लागले. झणझणीत झुणक्याने महाराजांस ठसका लागला. त्यांनी पाणी मागितले, बरोबरच्या डॉक्टरांनी पाणी पिऊ नका म्हणून नम्र विनंती केली. भाऊरावांनी एका पोराला खूण केली. पोरगा तुरुतुरु बाजूच्या नारळाच्या झाडावर चढला. दोन-तीन शहाळे तोडून खाली टाकले. एक फोडून ते पाणी महाराजांस पिण्यास दिले. महाराज पुन्हा झुणका भाकरी आनंदानं खाऊ लागले आणि ते कवळाण्याच्या आपल्या गावी मनाने जाऊन पोहोचले.

एकसंध समाजनिर्मितीसाठी प्रयत्नरत भाऊरावांचे छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसच्या माध्यमातून चाललेले जातीनिर्मूलनाचे काम पाहून सयाजीराव खुश झाले. या भेटीप्रसंगी भाऊरावांच्या प्रयत्नांचे महत्त्व विशद करताना सयाजीराव म्हणतात, “हिंदुस्थानच्या प्रगतीस लागलेल्या अत्यंत जालीम जाती विशिष्टरूपी किडीच्या मुळावरच रा. भाऊराव यांनी कुऱ्हाडीचा घाव घातल्यामुळे ती या बोर्डिंगच्या व्यवस्थेमुळे मुळातूनच नष्ट होणार आहे. असे बोर्डिंग व याची तत्त्वे अमलात आणण्याची रीत हिंदुस्थानात कुठेच दिसून येत नाही.” सयाजीरावांना भाऊरावांचा सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्र वसतिगृहाचा यशस्वी प्रयोग पाहून झालेला आनंद महत्त्वाचा होता. कारण सयाजीरावांनी त्यांच्या संस्थानात स्पृश्य अस्पृश्य सहशिक्षणाचा प्रयोग यशस्वी केला होता.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९३३ मध्ये ज्यावेळी सयाजीराव भाऊरावांच्या वसतिगृहाला भेट देत होते. त्याचवर्षी बडोद्यातील अस्पृश्य शाळेतील विद्यार्थी संख्या ४,७७५ होती तर स्पृश्य अस्पृश्य मिश्र शाळेतील विद्यार्थांची संख्या १६,२७९ इतकी होती. म्हणजेच अस्पृश्य शाळेतील विद्यार्थी संख्येच्या चार पट विद्यार्थी संख्या बडोद्यातील मिश्र शाळेत होती. महाराजांच्या बडोद्यातील प्रयोगाच्या यशाचा पाठलाग करणारा भाऊरावांचा वसतिगृहाचा हा यशस्वी प्रयोग पाहून महाराजांइतका आनंद कोणाला होऊ शकतो. याउलट सयाजीरावांच्या कार्याबद्दल

भाऊरावांच्या मनात आदर होता. तो आदर मुख्यत: प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि अस्पृश्यता निर्मूलन या दोन क्षेत्रातील सयाजीरावांच्या क्रांतिकारक यशाबद्दल होता. यासंदर्भात कर्मवीरांच्यावर संशोधन करणारे डॉ. आर.ए. कडियाळ म्हणतात, "In the case of Maharaja Sayajirao Gaikwad, Bhaurao appreciated his far-sighted democratic administration in his state; his experiment of universal and compulsory free primary education; his attempt at eradication of untouchability;"

जानेवारी १९३६ मधील सयाजीरावांच्या राज्यकारभाराच्या हीरकमहोत्सवी कार्यक्रमाचे रयत शिक्षण संस्थेस आमंत्रण होते. हे आमंत्रण सयाजीरावांच्या मनातील भाऊराव आणि रयत शिक्षण संस्था यांच्याबद्दलच्या आपुलकीची साक्ष देणारे आहे. या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या वतीने भाऊराव पाटील, एम. बी. मुथा, बी.एन. नलावडे आणि बी.एस. बारटक्के यांचे शिष्टमंडळ उपस्थित राहिले. यावेळी दरबारी रिवाजाप्रमाणे भाऊरावांच्या डोक्यावर पगडी नसल्यामुळे सडेकर-पवार यांनी त्यांना मंडपाच्या प्रवेशद्वारावर अडवून आत जाता येत नसल्याचे सांगितले. तेव्हा भाऊरावांनी त्यांना 'या वेशात तुम्ही मला आत जाऊ देत नसाल तर मी येथूनच परत जाईन' असे सडेतोड उत्तर दिले. दरम्यान सयाजीरावांनी व्यासपीठावरून प्रवेशद्वारावरील डोक्यावर पगडी नसणाऱ्या भाऊरावांना पाहिले. तेव्हा

भाऊरावांना सन्मानाने मंडपात आणण्यासाठी त्यांनी राजरत्न आर.एस. माने-पाटील यांना पाठवले. माने-पाटलांसोबत सन्मानाने आत जाऊन भाऊरावांनी सयाजीरावांना मानपत्र अर्पण केले. सयाजीरावांच्या मनात भाऊराव आणि त्यांचे कार्य याविषयीचा असणारा आदर या प्रसंगातून अधोरेखित होतो.

## मुंबईतील भेट

सयाजीरावांनी १९३३ ला छत्रपती शाहू बोर्डिंगला भेट देण्याआधीपासूनच भाऊराव सयाजीरावांच्या संपर्कात होते असे दिसते. १९३६ च्या हीरकमहोत्सवी कार्यक्रमाच्या भेटीनंतर भाऊराव आणि सयाजीरावांच्यात पत्रव्यवहार असण्याची शक्यता अधिक आहे. कारण सयाजीरावांनी १९३७ मध्ये युरोपच्या दौऱ्यावरून परतत असताना इजिप्तमधील जिबुटी बंदरातून २६-११-१९३७ रोजी भाऊरावांना तार करून मुंबईत भेटण्यासाठी बोलावले. या मुंबई भेटीत भाऊरावांनी स्वावलंबी तत्त्वावर शाळा व वसतिगृह सुरू करून मोफत शिक्षणाची सोय करण्याची कल्पना मांडली. या कल्पनेनुसार मुलांनी रोज २ तास शारीरिक श्रम करून त्याबदल्यात माध्यमिक शिक्षण मोफत घ्यावे अशी ती योजना होती. महाराजांना ही योजना आवडली. त्यांनी ही शाळा व संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्याच्या उद्देशाने ४,००० रु.ची मदत दिली. या मदतीतून जमनाबाई गायकवाड शिष्यवृत्ती सुरू झाली. भाऊरावांच्या अपेक्षेपेक्षा

ही मदत फारच कमी होती. भाऊरावांनी तसे महाराजांस बोलून दाखविले. तेव्हा महाराजांनी हा मदतीचा पहिला हप्ता आहे असे सांगितले. 'महाराजा सयाजीराव फ्री ॲन्ड रेसिडेन्शिअल हायस्कूल' हे हायस्कूल म्हणजे रयत शिक्षण संस्थेच्या जीवनातील एक क्रांतिकारक वळण होते.

महाराष्ट्राचा भूमिपुत्र असणाऱ्या आणि आपल्या कर्तुत्वाने आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवलेल्या सयाजीरावांच्या नावाने सुरू झालेली महाराष्ट्रातील ही पहिली संस्था होती. सयाजीरावांनी आपल्या बडोदा संस्थानात शाळा आणि ग्रंथालये यांचा प्रसार करून ज्ञानाचे लोकशाहीकरण केले होते. यासंदर्भात कडियाळ पुढे म्हणतात, "Lastly, he was the first Indian Prince to allow his subject to taste the fruits of Democracy in his state, When it was asked of His Highness, "How his State would fare after his death?" he immediately answered, "It will depend upon the wisdom and goodness of those at the helm of the affairs of the State and the people's desire, If the foundation of good administration is laid in the State once, the State would continue to make progress. There need not be a cause for fear."

## ‘महाराजा सयाजीराव फ्री अँड रेसिडेन्शिअल हायस्कूल’

हायस्कूलची पायाभरणी होण्याअगोदरच महाराजांचे निधन झाले. सयाजीरावांचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण स्मारक म्हणून महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात या शाळेचे वेगळे महत्त्व आहे. विशेष म्हणजे रयत शिक्षण संस्थेचा आत्मा असणाऱ्या ‘कमवा आणि शिका’ योजनेचा आरंभ या शाळेच्या स्थापनेबरोबरच झाला. ३ डिसेंबर १९३९ रोजी भाऊरावांनी साताऱ्यात ‘महाराजा सयाजीराव फ्री अँड रेसिडेन्शिअल हायस्कूल’ या निवासी माध्यमिक विद्यालय आणि ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ सयाजीरावांचे नातू आणि उत्तराधिकारी प्रतापसिंह यांच्या हस्ते केला. विशेष म्हणजे या समारंभाचे पौरोहित्य विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले तर संध्याकाळी गाडगे महाराजांनी कीर्तन केले. या समारंभाला महाराष्ट्रातील अनेक संस्थानिक व त्यांचे सरदार उपस्थित होते.

भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेचे ‘स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद’ ब्रीदवाक्य असणारे हे पहिले निवासी माध्यमिक विद्यालय २० जून १९४० रोजी सुरू झाले. सयाजीरावांनी केलेल्या अस्पृश्योद्धार आणि शैक्षणिक कामाचे स्मारक म्हणून भाऊरावांनी या माध्यमिक विद्यालयाला ‘महाराजा सयाजीराव फ्री अँड रेसिडेन्शिअल हायस्कूल’ असे नाव दिले. सयाजीराव महाराजांचे व्यक्तिमत्त्व किती अनुकरणीय होते आणि भाऊरावांनी त्यांचा आदर्श का स्वीकारला हे कडियाळ

यांनी समर्पकपणे सांगितले आहे. ते म्हणतात,"Here was an ideal of personality to be imitated by the younger generation of India, Hence his name was given to this first high school started Bhaurao Patil."

सयाजीरावांनी १८८२ मध्ये सोनगढ येथे सुरू केलेल्या आदिवासी वसतिगृहास १९०० मध्ये ३० एकर जमीन कसण्यासाठी दिली होती. या जमिनीतून भाजीपाला पिकवून वसतिगृहाचे विद्यार्थी तो विकत असत. या प्रयोगाचा दुहेरी हेतू होता. पहिला हेतू आदिवासींना प्रगत शेतीचे शिक्षण देणे आणि दूसरा हेतू असा होता की शिकत असतानाच त्यांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध करून देणे. थोडक्यात संस्थानी खर्चाचे मोफत शिक्षण, राहण्या-खाण्याची सोय केल्यानंतरही विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी सयाजीरावांनी भारतात सर्वप्रथम 'कमवा व शिका' योजनेची सुरुवात केली. याच योजनेशी नाते सांगणारी योजना कर्मवीरांनी सयाजीरावांच्या नावाने सुरू केलेल्या माध्यमिक विद्यालयाच्या माध्यमातून १९४० मध्ये महाराष्ट्राला दिली.

## सयाजीरावांचा प्रभाव

भाऊरावांनी काढलेले पहिले हॉस्टेल शाहू महाराजांच्या नावाने होते. कारण शाहू महाराजांनी कोल्हापुरात वेगवेगळ्या जातींसाठी एकूण ११ वसतिगृहे सुरू केली होती. सयाजीरावांनी बडोद्यात सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा

क्रांतिकारक उपक्रम १९३७ पर्यंत पूर्णत्वास नेला होता. याचा बोलका पुरावा म्हणजे १९३६-३७ मध्ये बडोदा संस्थानात अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या २०,९३३ होती. विशेष म्हणजे अस्पृश्यांच्या शाळेत शिकणाऱ्यांची संख्या ४,५३५ होती. तर मिश्र शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अस्पृश्यांच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ४ पट म्हणजेच १६,३९८ इतकी होती. ही भारतातील शैक्षणिक क्रांतीच होती. भाऊरावांची प्रेरणा सयाजीराव असल्यामुळे पहिल्या हायस्कूलला त्यांनी सयाजीरावांचे नाव दिले.

अजून एक या प्रसंगाशी जुळणारी बाब येथे विचारात घ्यावी लागते ती अशी की, २२ सप्टेंबर १९१७ ला शाहू महाराजांनी सयाजीरावांना पत्र लिहून 'माझ्या जीवनकाळात माझ्या संस्थानात मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साध्य करणे हे माझे जीवनध्येय आहे आणि याबाबत मी तुमच्या पाऊलावर पाऊल टाकून वाटचाल करत आहे' असे कळवले होते. १९१९ पासून शाहू महाराजांनी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी कोल्हापूर संस्थानात सुरू केली. त्याच वर्षी पुण्यासह दक्षिण महाराष्ट्रात हा कायदा व्हावा म्हणून जनआंदोलन गतिमान झाले होते. या आंदोलनात विठ्ठल रामजी शिंदे यांचा महत्त्वाचा वाटा होता. सातारा जिल्ह्यात या आंदोलनाचे नेतृत्व कर्मवीर अण्णा करत होते.

कर्मवीरांची प्रेरणा सयाजीराव होते याचा आणखी एक पुरावा म्हणजे १० ऑक्टोबर १९४० रोजी भाऊरावांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू आर. पी. मसाणी यांच्या हस्ते 'सौ. लक्ष्मीबाई पाटील फिरते वाचनालय व ग्रंथालय' सुरू केले. या फिरत्या वाचनालयाचीही प्रेरणा सयाजीरावांनी १९१० मध्ये 'सयाजीवैभव' या नावाने बडोद्यात सुरू केलेला फिरत्या ग्रंथालयाचा उपक्रम होता. स्कॉटलंडनंतर बडोद्यातील हा प्रयोग जगातील दुसरा प्रयोग मानला जातो.

शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणेच्या कामाचे एक ऊर्जाकेंद्र ज्याप्रमाणे बडोदा होते त्याप्रमाणे भाऊराव पाटलांच्या कामाचेही प्रेरणाकेंद्र बडोदा होते. कारण ज्याप्रमाणे कर्मवीरांवर शाहू महाराजांचा प्रभाव होता त्याचप्रमाणे कोल्हापुरात विद्यार्थी असताना १९०८ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भाषणाने कर्मवीर भाऊराव पाटलांच्या भावी कार्याला विधायक दिशा दिली होती. त्या विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्यांच्या उद्धाराच्या कार्याची प्रेरणा सयाजीराव होते. या संदर्भात विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात,"एकंदरीत या थोर पुरुषाच्या अंतकरणात या हतभागी लोकांचा ध्यास सतत लागला होता, हे माझ्या ध्यानात येऊन चुकले. इतकेच नव्हे तर या महत्त्वाच्या विषयासंबंधी माझ्या स्वत:च्या विचारांना नवीन प्रोत्साहन मिळून ब्राह्मसमाजाच्या अखिल भारतातील माझ्या प्रचारकार्याबरोबर या लोकांची निरनिराळ्या प्रांतातील स्थिती स्वत: डोळ्याने नीट निरखून आजमाविण्याची मला प्रेरणा झाली."

म्हणजे १९०२ पासून भास्करराव जाधव आणि दीनबंधू यांच्यामार्फत महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव, १९०६ मध्ये अस्पृश्योद्धाराबाबतचे सयाजीरावांचे भाषण वाचनात येणे, १९०८ मध्ये कोल्हापुरात विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्य उद्धाराबाबतचे भाषण ऐकणे आणि शाहूनगरीतील जडणघडण हा कर्मवीर भाऊराव पाटलांचा पिंड घडवणारा 'विचारमेळा' आहे. फुल्यांपासून ते विठ्ठल रामजी शिंदे आणि शाहू यांचा बडोद्याशी असणारा वैचारिक संवाद विचारात घेता महाराष्ट्राची पुरोगामी विचार परंपरा घडवणाऱ्या 'रयत चळवळीला' आत्मबळ देण्यात सयाजीरावांचे असणारे योगदान स्पष्ट होते. पुरोगामी चळवळीचा इतिहास तुटकपणे अभ्यासल्यामुळे हे पचणे आपणास जड जाते. परंतु 'जोडलेला इतिहास' (Connected History) या संजय सुब्रमण्यमच्या प्रगत संकल्पनेचा आधार घेत जेव्हा आपण महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची पाळेमुळे खणू लागतो तेव्हा सयाजीराव या 'गंगोत्री'पर्यंत जाऊन पोहोचतो.

वरील विवेचनावरून शूद्रातिशूद्रांच्या गुलामगिरीचा अंत करण्यासाठी फुल्यांनी ज्ञानाचे जे शस्त्र शोधून काढले होते त्याचा 'महाप्रयोग' सयाजीरावांनी बडोद्यात केला. या प्रयोगाची ऊर्जा इतकी जबरदस्त होती की तिने महाराष्ट्राचा आसमंत कायमचा 'प्रकाशमान' केला. अर्थात कर्मवीरांची आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था हे तिचे सर्वात दैदीप्यमान यश होते. या संदर्भात कर्मवीरांचे समकालीन आणि राजर्षी शाहूंच्या तालमीत

तयार झालेले पी.सी.पाटील जो कबुलीजबाब देतात तो वरील विश्लेषणाला भक्कम आधार पुरवतो. पाटील म्हणतात,“मराठा समाजांत शिक्षणाच्या वृद्धीसाठी आपण जे अत्यंत बहुमोल परिश्रम घेत आहात त्याबद्दल मराठा समाज अत्यंत ऋणी राहील यात शंका नाही. माझ्या वेळी कॉलेजात शिक्षण घेणारे मराठे चार पाचच होते, पण आता ती संख्या ३०० वर गेली आहे. याचे सर्व श्रेय महाराज आपणाला आहे हे आम्ही कधीही विसरणार नाही.” एकूणच महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात सयाजीरावांची भूमिका किती महत्त्वाची होती हे पी. सी. पाटलांच्या वरील विधानातून स्पष्ट होते.

खुद्द कर्मवीरांच्या शब्दात सांगायचे झाले तर “१९०६ साली मी आपले अंत्यजोद्धारासंबंधी भाषण वाचले व त्या भाषणाने माझ्या मनामध्ये अतिशय खळबळ उडवून दिली. मी तेव्हाच निश्चय केला की, श्रीमंत महाराजांनी दर्शविलेल्या विचाराप्रमाणे व व्यक्त केलेल्या ध्येयास अनुसरून आजन्म प्रयत्न करावयाचा. उपजीविकेस साधन म्हणून नोकरी करून जे काही पैसे शिल्लक राहतील ते हीन मानलेल्या लोकांस ज्ञान देऊन त्यांना पुढे आणण्यामध्ये खर्च करावयाचे. या हेतूने मी काही दिवस नोकरीही केली; परंतु त्या व्यवसायामुळे माझे ध्येय बरोबर मला गाठता येईना, म्हणून नोकरीवरही मी तिलांजली दिली व प्रस्तुतचे कार्य अंगावर घेतले.”

वरील सर्व संदर्भ विचारात घेता सयाजीराव आणि भाऊराव पाटील यांच्यातील कृतिशीलतेचा समान धागा या दोघांना जोडणारा प्रमुख दुवा होता हे स्पष्ट होते. महापुरुषांचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्याच्या आपल्या भूमिकेमुळे आपले किती बौद्धिक नुकसान झाले आहे याचा विचार आता आपल्याला करावा लागेल. कारण ज्याप्रमाणे विठ्ठल रामजी शिंदे, शाहू महाराज यांना सयाजीरावांच्या कार्याने प्रेरणा दिली होती. तशीच प्रेरणा कर्मवीर भाऊराव पाटलांना सयाजीराव, विठ्ठल रामजी शिंदे आणि शाहू महाराज यांनी दिली होती याचे दाखले खुद्द कर्मवीरांनीच नोंदवून ठेवले आहेत. म्हणूनच परंपरा मग ती पुरोगामी असो किंवा प्रतिगामी तिचा जोडून विचार केल्याशिवाय तिचे नेमके स्वरूप समजून घेणे शक्य होत नाही.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक ‘क्रांतीपर्व’ - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



### ❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com